## समाजवाद (Socialism)

आधुनिक कालखंडात, पाश्चात्य समाजात, कल्याणवाद उदारमतवाद लोकशाही सामाजिक डार्विनवाद आदींप्रमाणेच समाजवाद ही विचारधारा उदयास आली. या काळातील औद्योगिकरण आधुनिकीकरण तंत्रज्ञान इत्यादींमुळे समाजात निर्माण झालेल्या परिस्थितींना उत्तर म्हणून –समस्यांना उत्तर म्हणून, समाजातील भेदभाव उच्च–निचता, वर्गांमधील अंतर दूर करणारा पर्याय म्हणून समाजवादी विचारधारेचा उगम झाला. मानवतावाद व उदारमतवाद यांच्या मर्यादा व विरोधाभास स्पष्ट झाल्यावर मानवतावादी उदारमतवादाच्या जागी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात समाजवादी मानवतावाद उदयास आला.

सामुहिक मालकीची संकल्पना प्राचिन ग्रिक कालापासून अस्तित्वात होती. 'राज्यकर्त्यांची सर्वच गोष्टींवर मालकी असते. व्यक्तिगत इच्छेपेक्षा राज्याचे कल्याण सर्वोच्च असते.' अश्या पद्धतीने ही संकल्पना इ.स.पूर्वी ३०० वर्ष प्लुटो या तत्त्ववेत्याने मांडली होती.

Scanned by CamScanner

कार्ल मार्कस् समाजसत्तावादाचे जनक होते. त्यांचा जन्म ५ मे १८१८ साली पश्चिम जर्मनीत झाला. त्यांनी औद्योगिक क्रांतीसंबंधी १८४० साली काही ठळक सिद्धांत मांडले. १८६४ साली कम्युनिस्ट मॅनिफेस्टो १८६७ साली दास कॅपिटल चा पहिला खंड प्रसिद्ध केला. हे ग्रंथ साम्यवादयांकरीता बायबल आहेत. त्यांच्या समाजवादी विचारांना क्रांतीकारक किंवा शास्त्रीय समाजवाद म्हणतात. त्यांनी देशोदेशीच्या समाजवादी संघटनांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी, 'कम्युनिस्ट समिती', स्थापन केली. १८४७ मध्ये पहीली कम्युनिस्ट संघटना, 'कम्युनिस्ट लिग,' स्थापन केली गेली.

समाजसत्तावादाचे जनक कार्ल मार्क्स यांनी मानव इतिहासाचा अभ्यास करुन समाजाचे चार प्रकार केले. अतिप्राचिन कम्युनिस्टवादी समाज, गुलामगिरी असणारा पुरातन समाज, सरंजामशाही समाज व भांडवलशाही समाज. हे समाज एका नंतर निर्माण झाले व प्रत्येक एका समाजात, समाजातील वर्गावर्गात असमानता होती.

मार्क्सवादी ऐतिहासिक अतिभौतिकवादाने मानव समाजाचे, शिकारावस्था–कृषी अवस्था–बागाईत अवस्था–औद्योगिक अवस्था–आधुनिकोतर अवस्था असे वर्गिकरण करून प्रत्येक अवस्थेत उत्पादनाच्या आधारे भेदभाव निर्माण झाल्याचे नमुद केले आहे.

समाजसत्तावादाचा पुरस्कार करतांना, समानतेवर आधारलेल्या–समानता असलेल्या–छोट्या समुदायांवर आधारलेल्या, समाजाची–काल्पनिक सुराज्याची कल्पना, समाजसत्तावाद्यांनी केली. या समाजवादात एकी--सद्‌भाव–बंधुता–लोककल्याणवाद अंतर्भूत होता. यात मध्यम वर्गाला, वैयक्तिकरणाला स्थान नव्हते.

Scanned by CamScanner

समाजसत्तावादाला कार्ल मार्क्स यानी कम्युनिस्टवाद म्हटले. त्यांनी समाजाचा अभ्यास करून असे भविष्य वर्तविले की–

जेव्हा भांडवलशाही आंतरराष्ट्रिय स्तरावर निर्माण होईल तेव्हा जगातला कामगारवर्ग एकत्र होवून भांडवलशाही झुगारुन देईल व तेथे तो समाजसत्तावादाची स्थापना करेल. खाजगी मालमत्ताचे अस्तित्त्व नष्ट होईल, उत्पादनाचे राष्ट्रियकरण होईल, उत्पादने राज्याच्या हाती जातील, वंशपरंपरा, वंशपरंपरागत अधिकार नष्ट पावतील.

मार्क्सवादानुसार प्रत्यक्ष कार्यासाठी उपयोगी पडणे, हे सैद्धांतिक ज्ञानाचे काम असते. वर्ग हिताची अभिव्यक्ति या ज्ञानातुन होते. तत्त्वज्ञानातून वर्गसंघर्षाची साधने निर्माण होणे गरजेचे असते. अमुर्तपणे सत्य शोधणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य नसते. तत्त्वज्ञानाने खालच्या वर्गातील–मजुर वर्गातील बौद्धिकतेचे शस्त्र मजबुतपणे घडविणे अपेक्षित असते.

कार्ल मार्कस्च्या मते भांडवलशाहीत भांडवलदार कामगाराला श्रमशक्तिचे मूल्य देवून त्याच्या श्रमाचे फळ विकत घेतो. कामगाराला त्याने केलेल्या श्रमाचा मोबदला कधीच मिळत नाही. भांडवलदाराचा नफा म्हणजे कामगाराच्या मोबदल्यातील कपात होय या कपातीमुळे कामगाराची क्रयशक्ती कमी होते तो माल विकत घेवू शकत नाही. खाजगी भांडवलशाही अस्तित्वात असे पर्यंत ही नफेबाजी व कामगारांची पिळवणूक अपरिहार्य आहे, भांडवलदार व कामगार यांचा संघर्ष अटळ आहे. एखाद्या देशाच्या सरकारने कामगार कल्याणाचे कायदे केले तरी त्यामुळे वर्ग युद्ध लांबणीवर पडेल पण टळणार नाही. तेव्हा वरवरच्या समझोत्यात कामगारांनी समाधान न मानता वर्गयुद्धास तयार व्हावे आपला संघ बनवून देशातील उत्पादन संघटना ताब्यात घ्यावी.

समाजातील शोषकांशी लढा देवून–त्यांचा पराभव करून–श्रमिकांची सत्ता स्थापन केली पाहीजे, असे कार्ल मार्कस् सांगतात. अर्थरचना हा सामाजिक जीवनाचा पाया आहे त्या मुळे समाजवादी समाजात राष्ट्रियकरणाला अत्यंत महत्व आहे. समाजवादी क्रांतीत उत्पादनसाधनांवर श्रमिकांची सत्ता आवश्यक आहे.

समाजाचा इतिहास हा, 'आहे रे.' आणि 'नाही रे.' यांच्यातील संघर्षाचा, वर्गलढयाचा इतिहास आहे असे समाजवाद मानतो.

विरोध विकासवाद, भौतिकवादी तत्वज्ञान, इतिहासाची भौतिकवादी मिमांसा, अतिरिक्त मूल्यांचा सिद्धात, वर्ग विग्रहाचा सिद्धांत, मार्कस यांचे योगदान आहे.

या तत्वज्ञानाने, कामगारवर्गाला एक लढाऊ तत्वज्ञान दिले. कामगारांचा विजय होतो हा आशावाद दिला. शोषितांना दिलासा दिला.

अर्थात ह्या मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा ज्या राष्ट्रांनी स्वीकार केला आणि त्यावर आधारलेला विकासाचा जो नमुना त्यांनी स्वीकारला तो जवळपास साम्राज्यवादी जगाने स्वीकारलेल्या नमुन्या सारखाच होता. वस्तुंचे–सेवांचे उत्पादन, त्यांची निर्मिती आणि त्याचा उपयोग–उपभोग यांनाच, साम्राज्यवादी जगाप्रमाणेच, समाजसत्तावादी राष्ट्रातही विकासाचे चिन्ह मानले जात होते. अर्थात तेथे उत्पादन–उपयोग आणि

Scanned by CamScanner

वितरण यांच्याशी संबंधीत निर्णय हे बाजारपेठेच्या नव्हे तर राजकिय व्यवस्थेच्या ताब्यात होते.

**समाजावरील प्रभाव -**

१९ व्या शतकाच्या पुर्वार्धात या विचारधारेच्या प्रभावामुळे कामगार संघटीत होवू लागले. औद्योगिकरणात कामगारांचे योगदान महत्त्वाचे होते व आता ह्या कामगारांच्या संघटना निर्माण होवू लागल्या. या संघटना भांडवलशाही व्यवस्थेशी लढा देण्याच्या कामी येवू लागल्या–दडपशाहीला विरोध करू लागल्या. खाजगी जमीनी आणि खाजगी यंत्रणांच्या जागी, उत्पादन आणि वितरणाच्या क्षेत्रात सामुहिक मालकी नियंत्रण व त्यात कामगारांचा सहभाग, ही संकल्पना कामगार संघटनांच्या माध्यमातून समाजात रुजू लागली.

या विचारधारेवर आधारीत समाजसत्तावादी पक्ष १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोप व अमेरिकेत स्थापन झाले. विविध देशातील हे पक्ष पुढे आंतरराष्ट्रिय पातळीवर एकत्र आले. १८९० ते १९१४ च्या कालखंडात या पक्षांनी अनेक देशात सत्ता हस्तगत केल्या. एवढी ही विचारधारा समाजाला प्रभावित करून गेली. यामागे मार्क्सवादाची प्रेरणा होती.

याच काळात औद्योगिकरण झाले. विज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा विकास झाला. नोकऱ्यांचे प्रमाण वाढले. किमती स्थिर झाल्या. स्त्रियांचा कामात सहभाग वाढला. बालकल्याणाच्या सुविधा वाढल्या. शिक्षण व आरोग्य क्षेत्राचा विकास झाला. समाजात कल्याणभिमुखता आली. सैनिकी सामर्थ्य वाढले.

पहिल्या महायुद्धानंतर ही चळवळ थंडावली आणि रशियन क्रांतीनंतर क्रांतिकारी समाजवाद्यांनी कम्युनिस्ट पक्ष स्थापन केला. या राजकिय पक्षाने रशियात अनेक वर्षे राज्य केले. या काळात समाजातील आर्थिक असमतोल–वर्गावर्गांमधील आर्थिक तफावत कमी झाली. तथापी नव्या असमानता समाजात निर्माण झाल्या आणि पुन्हा समाजातील काही घटक समाजापासून दूर लोटले गेले, आणि त्यांना यातना होत राहील्या, त्यांचे शोषण होत राहीले. बुद्धिवादी व नोकरशाही वर्गाने आता साधन संपत्ती सत्ता–दर्जा मिळवला आणि त्यांनी भांडवलदारांची जागा घेतली. उच्चस्थान प्राप्त झालेल्या या वर्गाकडून आता निम्नवर्गाचे शोषण होवू लागले. उत्पादन माध्यमांची मालकी या उच्च वर्गाकडे औपचारिक स्वरूपात नव्हती तरी उत्पादनावर मात्र त्यांचे नियंत्रण होते. महत्त्वाच्या साधनांचे वाटप–साधनांचे व्यवस्थापन, यावर बुद्धिवादी व नोकरशाही वर्गाचे नियंत्रण होते. अशा रीतीने आधुनिक समाजात बदल घडविणाऱ्या इतर विचारधारांप्रमाणेच या विचारधारेच्या प्रभावा नंतरही समाजातील असमतोल बदललेल्या स्वरुपात कायम राहिला. समाजवादातुन अपेक्षित असणारा एकजीनसी समाज निर्माण झाला नाही.

पुढे समाजवादानेही हुकुमशाही स्वरूप धारण केले. यामुळे पुढे १९८९ साली

Scanned by CamScanner

अनेक राष्ट्रातून समाजसत्तावादी राजवटीचा अस्त झाला १९९१ साली सोव्हीएत रशिया या सर्वात मोठ्या समाजसत्तावादी देशाचे विभाजन झाले. आणि हुकुमशाही भांडवलशाही यांना समाजवादाने दिलेले आव्हान, म्हणजेच दूसरे जग जवळपास संपुष्टात आले.

समाजाचा मार्कवाद आणि समाजवाद याबद्दल भ्रमनिरास झाला. यामुळे या राजवटीविरुद्ध विचारसरणी विरुद्ध विद्रोह देखील घडले. मार्क्सवादाची सुधारित आवृत्ती प्रस्तुत झाली.

या काळात मूलगामी लोकशाहीचा प्रभाव वाढला आणि त्यामुळे तळागाळातील लोकांचा विचार होवू लागला. आज समजावाद, पाश्चात्य वसाहतवाद आणि पाश्चात्य ज्ञानावर टिका करतो. सामुदायिक जाणीव विकसित करून समाजवादाचे भविष्य म्हणून सामुदायिक जाणिवेकडे पाहतो.

अर्थात १९८० दरम्यानच्या अभ्यासामध्ये कट्टर मार्क्सवादावर टिका जरी करण्यात आली तरी समाजवाद–मार्क्सवादाचे उपयोग मान्यही केले गेले.

## समाजकार्यावरील प्रभाव

समाजवादाने समाजाला प्रभावित केले. आधुनिक समाजातील ही एक प्रधान विचारधारा होती. यामुळे समाजातील निम्नवर्गाकडे, त्याच्या समस्यांकडे पाहण्याची दृष्टि बदलली. कल्याणकारी सेवांतून या वर्गाच्या गरजा पूर्ण करतानाच समाजापासून या घटकांना दूर करणाऱ्या व्यवस्थेकडे पाहण्याची दृष्टि समाजवादामुळे समाजकार्याला मिळाली. कल्याणकारी ते विकासात्मक असा समाजकार्याचा प्रवास होण्यात या विचारधारेचे योगदान महत्त्वपूर्ण मानता येईल. उपचारात्मक सुधारात्मक पूनर्वसनात्मक सेवांकडून समाजात बदल–समाजव्यवस्थेत बदल घडवण्याचा जो मार्ग, समाजकार्यात निर्माण झाला, त्यासाठी ही विचारधारा पुरक ठरली. व्यवस्थामार्गाने, परिस्थितीजन्य दृष्टिने मानव समाजाचा समस्याचा आणि गरजांचा मुळापासून जो विचार समाजकार्यात होवू लागला, त्याला ही विचारधारा उपयुक्त ठरली. म्हणूनच ही समाजकार्याची एक महत्त्वपूर्ण विचारधारा ठरली. सबब ह्या विशिष्ट विचारधारेचा व अन्य अनुषांगिक विचारांचा समाजकार्याच्या शिक्षणात अंर्तभाव झाला. अर्थात समाजकार्यात विविध दृष्टिकोन अंतर्भूत होण्याची ही प्रक्रिया केवळ आधुनिक काळातच घडली नसुन आधुनिकोत्तर सद्यकालीन समाजातही ती सुरू आहेच.

समाजकार्याला शोषितांची वकीली करण्याची भूमिका घेण्याची गरज आधुनिकोत्तर काळात प्रकर्षाने जाणवली. ही भूमिका पार पाडताना या विचारधारेचे मार्गदर्शन समाजकार्याला प्राप्त झाले. समाजातील शोषितांचा विचार करताना त्यांच्या वतीने लढा उभारताना या विचारधारेने समाजकार्याला पक्का पाया उपलब्ध करून दिला. समाजातील मागे पडलेल्या वर्गाला बरोबर आणताना व केंद्रस्थानी आणताना जी सक्रिय भूमिका समाजकार्याने करण्याचे ठरविले त्या भूमिकेचा एक आधार ही

Scanned by CamScanner

विचारधारा ठरली. समाजातील परिस्थिती आणि समाजाची गरज लक्षात घेता समाजापासून दूरावलेल्या वर्गाला सेवा देताना समाजकार्याला या विचारधारेचाही उपयोग करता आला.

**समाजपरिवर्तनाच्या आधुनिक विचारधारा**

- पाश्चात्य
  - १. सामाजिक डार्वीनवाद
  - २. उपयुक्ततावाद
  - ३. उदारमतवाद
  - ४. बुद्धिप्रामाण्यवाद
  - ५. मानवाधिकार
  - ६. कल्याणवाद
  - ७. लोकशाही
  - ८. समाजवाद
- भारतिय
  - १. ख्रिस्ती विचारधारा
  - २. हिंदू सुधारणावादी चळवळी
  - ३. कामगार चळवळी
  - ४. दलित चळवळी
  - ५. राष्ट्रवाद
  - ६. गांधीवाद
  - ७. सर्वोदय
  - ८. भारतिय संविधानाची विचारधारा
  - ९. ऐच्छिक संघटनांची विचारधारा

प्रमाणे

- समानतेवर आधारलेला समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवतो
- सद्भाव, बंधुता, लोककल्याणवाद यांचा त्यात अंतर्भाव होतो.
- यात वैयक्तिकरणास स्थान नाही
- समाजवाद भांडवलशाहीला नकार देतो.
- खाजगी मालमत्ता नष्ट करतो.
- उत्पादनाचे राष्ट्रियकरण करतो
- या विचारधारेप्रमाणे, अधिकार वंशपरंपरागत नाहीत
- समाजवादी व्यवस्थेत उत्पादन, उपयोग व उत्पादनाचे वितरण या संबंधीचे निर्णय राज्यांच्या हाती असतात.

Scanned by CamScanner

**मानवाधिकार :**

मानव समाजाच्या आधुनिक काळात, पाश्चात्येकडे, साम्राज्यवाद हुकुमशाही होती, वसाहतवाद होता यातून समाजात भेदभाव निर्माण झाले होते, दडपशाही होती, भांडवलवाद होता. या काळात उद्योग–विज्ञान–तंत्रज्ञान यांचा विकास झाला होता. या मुळे सत्ताधाऱ्यांचे नवे वर्ग समाजात निर्माण होत होते. या काळात लोक समान अधिकारांची मागणी करू लागले होते. राजेशाहीचा विरोध करू लागले होते. या काळात कामगार संघटित होवू लागले. समाजात १७ व्या शतकापासून अस्तित्वात असणारा मध्यम वर्ग, राजकिय आणि नागरी स्वातंत्र्याचा आग्रह धरू लागला.

या काळात विरोधकांना, राजकिय मतभेद असणाऱ्यांना सत्ताधाऱ्याकडून नेस्तनाबुत केले जात असे. त्यांचे नागरीकत्व रद्द करणे, नागरिक अधिकार काढून घेणे, त्यांची मालमत्ता हीरावून घेणे, त्यांना हकलुन देणे, त्यांच्यावर जुलुम करणे अशा अनेक घटना घडत असत हुकुमशाहीचा–जुलुमशाहीचा हा परिपाक असे. मात्र आधुनिक काळात, विरोधकांवर केले जाणारे अत्याचार थांबावेत अशी मागणी केली जावू लागली. (ह्या सर्व बाबी पुढे लोकशाहीच्या व मानवाधिकाराच्या अंगीभूत बाबी ठरल्या)

पहिल्या महायुद्धानंतर, जेते आणि जीत, वसाहती आणि भांडवलशाही अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था ढासळल्या. युद्धाचा प्रत्यक्ष प्रभाव न झाल्याने आणि या काळात अमेरीकेचा व्यापार वाढल्याने अमेरीका एक श्रीमंत राष्ट्र झाले. महायुद्धात खिळखिळ्या झालेल्या राष्ट्रांनी अमेरीकेकडून पुनर्वसनासाठी भरमसाठ कर्ज घेतले. पण १९२९ च्या मंदीनंतर कर्ज देणे अमेरीकेलाही शक्य उरले नाही. ह्यामुळे युरोपिय देशातील उद्योगधंदे बंद पडू लागले. इटली, स्पेन सारख्या देशात लोकशाही ढासळून सैनिकी हुकुमशाहीची तेथे स्थापना झाली आणि या हुकुमशाही देशांच्या आक्रमकतेमुळे आणि विस्तारवादामुळे दूसरे महायुद्ध ओढवले. या युद्धानेही प्रचंड वित्तहानी केली. परिणामतः युरोपिय देशांना वसाहती सोडणे भाग पडेल. आणि अमेरिकेचा याही वेळी महासत्ता म्हणून पुन्हा उदय झाला.

या नंतर १९४५ साली संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली. भविष्यातील युद्धे थांबवणे हा त्याचा उद्देश होता. या उद्देशाच्या पुर्ततेसाठी (i) मानवाधिकाराचा विकास करणे आणि (ii) साधन म्हणून त्याचा उपयोग करणे (iii) जगभर मानवाधिकाराची अंमलबजावणी करणे हा संयुक्तराष्ट्रसंघाचा कार्यक्रम ठरला. या विचारधारेमुळे, प्रत्येक मानवाच्या गरजा पूर्ण होतील अशी आशा, मानव समाजात निर्माण झाली. पुढे १९९२ साली मानवाधिकाराचे महत्त्व विषद करतांना संयुक्तराष्ट्रसंघाने असे नमुद केले की, मानवाधिकार आणि मुलभुत अधिकार नाकारले गेले तर व्यक्तिगत हानी तर होतेच शिवाय या मुळे राजकिय आणि सामाजिक असंतोषही निर्माण होतो, हिंसेची बिजे रोवली जातात. समाजात आणि राष्ट्राराष्ट्रांमध्ये संघर्ष उदभवतात.

अशारीतीने ही विचारधारा समाजात प्रभावी ठरू लागली.

Scanned by CamScanner

विचारधारा :

मानवाधिकाराकरीता समाजात अत्यंत उत्तम अशी नैतिक व्यवस्था असणे गरजेचे आहे. सध्याच्या स्थानिक स्वराज्याऐवजी उच्च कोटीची नैतिक व्यवस्था समाजात असले तर मानवाधिकार प्राप्त होतात.

मानवाधिकार म्हणजे निसर्गात उपजतपणेच असणारे-निसर्गातील अंगीभूत अधिकार होत. मानवाधिकार निसर्गदत्त अधिकार आहेत. हे अधिकार असले तरच, मानव म्हणून जीवन जगता येते. मानवाधिकाराची अशी सर्वसामान्य व्याख्या करता येते.

मानवाधिकार व मुलभूत स्वातंत्र्य, मानवाला पूर्णत्वाने विकास करण्याची परवानगी देते. या अधिकारांमुळे मानवाला पुढील विविध संधी उपलब्ध होतात –

- आपल्या मानवी गुणाचा पुरेपुर विकास आणि उपयोग करण्याच्या संधी
- आपल्या क्षमतांचा व कौशल्यांचा पुरेपुर विकास आणि उपयोग करण्याच्या संधी.
- आपल्या अध्यात्मिक आणि अन्य गरजा पूर्ण करण्याच्या संधी.

मानवधिकारामुळे मानवाला गुण, क्षमता आणि कौशल्यांचा विकास करण्याची–उपयोग करण्याची आणि विविध गरजांची पूर्तता करण्याची मुभा मिळते–परवानगी मिळते.

मानव जीवनात पुढील घटक असणे अनिवार्य असते. यामुळे मानव म्हणून जीवन जगता येते.

– मानवी महत्ता असणे.
– आदर मिळणे
– संरक्षण असणे

मानवजीवन या ३ अंगीभूत बाबींनी युक्त होण्याकरीता, मानवाधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्य, ह्या मुळ गोष्टी आवश्यक असतात. मानवाधिकार व मुलभूत स्वातंत्र्य मिळाले तरच या तिन बाबींना मानव जीवनात स्थान मिळते.

मानवाधिकारासंबंधीचे असे विचार संयुक्त राष्ट्र संघाने (१९९२) मांडले आहेत. संघ यांना अनन्यसाधारण महत्त्वाचे मानतो.

मानवाधिकारात विविध संकल्पना विविध विचारधारातून घेतल्या गेल्या आहेत.

निधर्मवादी मानवतावादातून – मानवी महत्ता घेतली गेली.
उदारमतवादातून – स्वातंत्र्य घेतले गेले.
लोकशाहीतून – सहभाग घेतला गेला.
समाजवादातून – समानता घेतली गेली.

मानवाधिकारांच्या विचारधारेचा क्रमाक्रमाने विकास होत गेला.

मध्यकाळात निधर्मी मानवतावाद अस्तित्वात होता. १८ व्या शतकात नागरी व राजकिय हक्कांच्या पायावर, मानवाधिकाराची उभारणी झाली. पुढे त्यात आर्थिक

Scanned by CamScanner

–सामाजिक–सास्कृतिक हक्क देखील अतर्भूत झाले. १९४८ सालच्या ३० कलमी जागतिक मानव हक्कांच्या जाहीरनाम्यात–अनेक राजकिय–धार्मिक–सास्कृतिक, परंपराचे –कल्पनाचे–विचाराचे, एकत्रीकरण आहे.

१९९० नंतर इतर अनेक विषयही मानवाधिकारात सन्मिलीत करण्यात आले जसे शांतता, विकास, स्वच्छ पर्यावरण, पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन, झालेल्या विकासाचे जतन आणि संरक्षण, तसेच मानवकुटुबाचा मानवसमाजाचा सदस्य या नात्याने जगाच्या पाठीवरील प्रत्येक मानवाला कशी वागणूक मिळावी, या बदलच्या अपेक्षा यात अंतर्भूत आहेत. (संदर्भवाचन–मानवाधिकार–व्यक्तिसहकार्य, भाग १)

मानवाधिकारांची जोपासना करण्यासाठी संयुक्तराष्ट्र संघाने दोन ठराव केले. १९६६ सालचे मानव हक्कांचे जागतिक जाहीरनामे ह्या ठरावांच्या आधारे तयार झाले होते.

मानव अधिकारांची राखण होते आहे किंवा नाही तसेच मानवाधिकारांचे उल्लंघन होते आहे काय? या बाबतचे निर्णय आंतरराष्ट्रिय पातळीवर घेणारे हे ठराव होते.

(१) द इटरनॅशनल कोव्हेनंट ऑन सिव्हिल ॲण्ड पॉलीटीकल राईटस्

(२) द इटरनॅशनल कोव्हेनंट ऑन एकॉनॉमीक, सोशल ॲण्ड कल्चरल राईटस्

हे ते दोन ठराव होत.

यापैकी पहीला ठराव उदारमतावर आधारलेला असुन ते, मानवाधिकाराला, भांडवलशाहीचे असणारे योगदान आहे. या द्वारे मानवाला, जीवन जगण्याचा, छळापासून मुक्तता मिळवण्याचा, गुलामगिरी –दास्यत्व–वेठबिगारी–बेकायदेशिर अटक यापासून मुक्ततेचा अधिकार, बहाल होतो. संचार स्वातंत्र्य, विचार व मत स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, बरे–वाईट याचा निवाडा करण्याचे स्वातंत्र्य यांचा त्यात अंतर्भाव असुन हे स्वतंत्र्य मानवाला मान्य केले जाते.

दूसरा ठराव समाजवादी गटाचे योगदान आहे. साधनांच्या पुनर्वाटपात राज्याने हस्तक्षेप करावा अशी त्यात शिफारस आहे. याद्वारे मुलभुत गरजांची पूर्तता करण्याचा अधिकार आणि जबाबदारी, राज्याकडे सोपवण्यात आली आहे. तांत्रिक व व्यावसायिक मार्गदर्शन देणे, प्रशिक्षण कार्यक्रम आखणे, धोरणे आखणे, समगतीने आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक विकास घडवणे, सुरक्षित रोजगाराची पूर्ण हामी देणे हे त्याचे विषय आहेत.

अमेरीकेने मंजूरी न दिल्याने हा दूसरा ठराव पहिल्या ठरावाच्या तुलनेत उपेक्षित ठरला.

बालहक्कांची सनद, अपगांचे अधिकार इत्यादींची निर्मिती मानव हक्कांच्या आधारेच झालेली आहे. मानवाधिकारासंबंधी विविध निर्णय व ठराव संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे सातत्याने होत असतात. देशोदेशी, मानव हक्काचे संरक्षण करणारे कायदे या संकल्पनेच्याच आधारे निर्माण होतात.

Scanned by CamScanner

करतात.

मानवाधिकार, औपचारिक तत्त्वांचा व व्यापक प्रतिज्ञेचा–कराराचा जाहीरनामा आहे. यात निश्चित स्वरूपाची बंधने लादली गेलेली नाहीत. हे अधिकार मान्य करणे अनिवार्य मानले जात नाही. तरीही संयुक्त राष्ट्र संघाचे सदस्य या जाहिरनाम्याचे महत्त्व व गांभिर्य लक्षात घेवून त्याचे पालन करतीलच अशी अपेक्षा केली जाते.

मानवाधिकार आणि स्वातंत्र्य यांच्या करारावर सर्व राज्यांना सह्या करण्याची मुभा आहे. सहीनंतर कराराची अंमलबजावणी करणे राष्ट्रांना बंधनकारक ठरते.

**समाजावरील प्रभाव -**

मानवाधिकारांना मिळालेल्या मान्यतेमुळे समाजात मानव म्हणून व्यक्तिचे महत्त्व वाढले. अमर्याद अधिकारांची कल्पना–अमर्याद स्वातंत्र्याची कल्पना, समाजात एकीकडे धोकादायक ठरू लागली तर दूसरीकडे अधिकारांबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्यांचे भान समाजाला येवू लागले.

सामाजिक–दायित्व, सांस्कृतिक–दायित्व यांच्यापेक्षा व्यक्तिचे अधिकार महत्त्वपूर्ण ठरल्याने समाजात कोरडेपणा, अलिप्तता येवू लागली. माणसूकीचा ओलावा कमी झाला. लोकांच्या मानसिकतेत, नीतिमूल्यात बदल झाले. यामुळे प्रथा–परंपरांबद्दल अनादर, इतरांबद्दल काहीशी बेपर्वाई, वाढली. समाजाच्या, समाजातील कुटुंबांच्या रचनेत, कार्यपद्धतीत परिवर्तने घडली.

यातून नव्या समस्या, समाजविघटनाचा धोका घेवून पुढे येवू लागल्या.

अर्थात हे अधिकार समानतेने समाजात सर्वांना उपलब्ध होत नसल्याने भेदभावाला चालना मिळते. अनेकांना हे अधिकार मिळतच नाहीत. समाजातील बलवान व चांगल्या स्थितीतील लोकांना हे अधिकार प्राप्त होतात. म्हणजे 'आहे रे!,' आणि 'नाही रे!,' या गटात समानता आणण्याचे मानवाधिकाराचे उद्दिष्ट समाजात पूर्ण होतांना दिसत नाही.

तरीही मानवाकडे, मानवाच्या अधिकारांकडे पाहण्याची दृष्टि या विचारधारेने बदलली हे मात्र नक्की!

**समाजकार्यावर प्रभाव -**

वरील विचारधारेने समाजकार्याचे तत्त्वज्ञान, मूल्ये आदी प्रत्येक बाबीला प्रभावित केले. समाजापासून दूरावलेल्यांना समाजाच्या मुख्य धारेत आणणाऱ्या सेवा, हा मानव या नात्याने वंचितांचा अधिकार ठरला. केवळ मूलभूत अधिकारच नव्हे तर मानवाधिकार ही आधुनिक काळात व्यापक सर्वसमावेषक संकल्पना ठरल्याने, समाजकार्याची व्याप्तीही वाढली. समस्या निवारणा प्रमाणेच विकासाच्या समानसंधी मिळणे, हा मानवाधिकार ठरला. पर्यायाने मानव हक्कांचे संरक्षण हे समाजकार्याचे क्षेत्र ठरले. मानव महत्तेला महत्त्व, मुलभूत स्वातंत्र्य या द्वारे, विविध गरजा पूर्ण करण्याच्या संधी आणि विकास साधण्याच्या संधी उपलब्ध होतात, हा समाजकार्यातील महत्त्वपूर्ण

Scanned by CamScanner

मुद्दा मानवाधिकार या विचारधारेमुळे अधोरेखीत झाला. स्त्री पुरुष अपंग बालक या सर्व मानव घटकांच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजा, परिस्थिती व समस्या लक्षात घेवून सेवा देणे, सेवा घेण्यास या घटकांना सक्षम करणे असे स्वरूप या विचारधारेच्या प्रभावामुळे समाजकार्याने धारण केले आहे.

समाजकार्य शिक्षणात या विचारधारेला महत्त्वाचे स्थान दिले गेले. किंबहुनाही समाजकार्याची एक महत्वपूर्ण विचारधारा ठरली. संपूर्ण समाजकार्याचा–समाजाकार्याच्या जबाबदाऱ्यांचा, मानवाधिकारांच्या संदर्भात विचार होवू लागला. ही विचारधारा अभ्यासणे समाजकार्यात अनिवार्य ठरू लागले.

**समाजपरिवर्तनाच्या आधुनिक विचारधारा**

- पाश्चात्य
  - १. उदारमतवाद
  - २. उपयुक्ततावाद
  - ३. सामाजिक डार्वीनवाद
  - ४. बुद्धिप्रामाण्यवाद
  - ५. कल्याणवाद
  - ६. समाजवाद
  - ७. लोकशाही
  - ८. मानवाधिकार
- भारतिय
  - १. ख्रिस्ति विचारधारा
  - २. हिंदू सुधारणावादी चळवळी
  - ३. कामगार चळवळी
  - ४. दलित चळवळी
  - ५. गांधीवाद
  - ६. सर्वोदय
  - ७. राष्ट्रवाद
  - ८. भारतिय संविधानाची विचारधारा
  - ९. ऐच्छिक संघटनांची विचारधारा

- ❋ मानवाधिकार समाजात शांतता निर्माण करतात.
- ❋ मानवाधिकार म्हणजे, निसर्गात उपजतपणे असणारे नैसर्गिक अधिकार होत.
- ❋ मानवाधिकार मुलभूत स्वातंत्र्य, पूर्णत्वाने विकासाचा अधिकार व परवानगी देते.
- ❋ मानवाधिकारामुळे गुणाचा क्षमतांचा विकास व उपयोग करण्याच्या, गरजा पूर्ण करण्याच्या संधी मिळतात.
- ❋ मानवाधिकार असण्याने मानव म्हणून जीवन जगता येते. मानव महत्ता, आदर व संरक्षणा यामुळे मानव म्हणून जीवन जगता येते.
- ❋ विविध विचारधारामधील विविध संकल्पना मानवाधिकारात अंतर्भूत होतात.
- ❋ मानवाधिकारांमुळे व्यक्तिगत हितसंबंध जपले जातात. सामाजिक राजकिय संतोष निर्माण होतो.

Scanned by CamScanner

(उदारमतवादाची प्रस्तावना येथे वापरावी)

आधुनिक समाजातील परिस्थितींमध्ये परीवर्तन घडवणारी ही एक प्रधान विचारधारा होय. समाजातील उच्च वर्गाकडून सत्ता–सामुग्री, जनसामान्यांकडे देणारी ही विचारधारा होय. 'स्वतःच्या जीवनावर स्वतःचा ताबा.' ही संकल्पना ही विचारधारा देते.

यापूर्वीच्या मध्यकालीन समाजात सामान्य जनतेला अधिकार नसल्याने त्यांना साधनापर्यंत–संधीपर्यंत पोहोचता येत नसल्याने, दर्जा व सत्ता नसल्याने व म्हणून पर्यायाने त्याचा विकास होत नसल्याने सामान्य जनता समाजापासून दूर सारली गेली होती–दूरावली गेली त्यांचे जीवन सुरक्षित नव्हते. समाजात शोषण होते.

वसाहतवाद, हुकुमशाही, साम्राज्यवाद, औद्योगिकरण यातून निर्माण झालेल्या समाजाला हाल अपेष्टा–यातना सोसाव्या लागत होत्या. त्यामुळे तो समाज, ते देश लोकशाही स्वातंत्र्याची मागणी करू लागले होते.

समाजातील अशा समस्या आणि गरजा लक्षात घेवून, या प्रश्नांना उत्तरे देणारी, उच्च–निच भेदभाव दूर करणारी ही विचारधारा आधुनिक समाजात निर्माण झाली.

या लोकशाही विचारधारेने संपूर्ण मानव समाजाला, संस्कृती–विचार–विचारपद्धती–जीवनपद्धती–मूल्ये–नातेसंबंध, या सर्वांना प्रभावित केले. मानवाधिकाराची दूसरी बाजू म्हणजे लोकशाही असे म्हणता येते.

**विचारधारा**

लोकशाहीनुसार, मानवाच्या ठिकाणी विविध क्षमता असतात–अनेक अव्यक्त क्षमता असतात. हा लोकशाहीचा विश्वास असतो. या क्षमतावर लोकशाहीचा विश्वास असतो. मानवातील संसाधनांची दखल लोकशाहीत घेतली जाते व मानव संसाधनांना वाया न जावू देता त्यांचा उपयोग केला जातो. निर्णय सामुहिकपणे घेतले जातात. सामुहिकपणे निर्णय घेणाऱ्या गटांना–संघटनांना– शासनाला, सत्ता देणारी व्यवस्था लोकशाही निर्माण करते. निर्णय प्रक्रियेत लोकांच्या सहभागाला आणि बहूमताला लोकशाहीत महत्त्व असते.

'काय उद्देश प्राप्त केले, यापेक्षाही उद्देश प्राप्त करण्याची, उद्देश प्राप्त करण्याचे अनुभव देण्याची प्रक्रिया अधिक महत्त्वाची असते', या वरील विश्वास म्हणजे लोकशाही. असे जॉन डेव्ह म्हणतात (समाजकार्य लोकशाहीवर आधारित आहे कारण यात मदतीच्या उद्देशां इतकेच महत्त्व मदत देण्याच्या प्रक्रियेला–पद्धतीला असते. मदती दरम्यान सहभाग–स्वातंत्र्य–समता यांना दिले जाणारे महत्त्व–त्यायोगे संवार्थीला मिळणाऱ्या अनुभवांचे प्रभाव, यांना समाजकार्यात महत्त्व असते.)

सहभागात्मक प्रक्रियेमुळे संपन्न आणि समृद्ध करणारे परिणाम प्राप्त होतात. अशा अनुभवांना लोकशाहीत महत्त्व असते. जे परिणाम अनुभव प्रक्रियेला संपन्न आणि समृद्ध करीत नाहीत त्यांना लोकशाहीत थाबविले जाते. कारण मानवाला प्रगल्भ, सपन्न

Scanned by CamScanner

आणि समृद्ध न करणारे अनुभव लोकशाहीला बाधा आणतात असं लोकशाही मानते म्हणून असे अनुभव लोकशाहीत अर्थहिन ठरतात.

आजच्या लोकशाहीत पुढील वैशिष्ट्ये आढळतात.

– अभिव्यक्तिचे स्वातंत्र्य
– मुक्त निवडणूका
– बहूसंख्यांचे राज्य
– अल्पसंख्यकांचे अधिकार
– राजकिय पक्ष
– सत्तेचे विकेंद्रिकरण
– घटनात्मक शासन
– खाजगी संस्था

लोकशाहीचे प्रकार पुढीलप्रमाणे केले जातात.

– अनेक पक्षांच्या प्रतिनिधींची लोकशाही म्हणजेच उदारमतवादी लोकशाही (उदा. भारतिय लोकशाही)

– जेथे लोक पक्ष नव्हे तर एकाच पक्षातील उमेदवारांना निवडतात अशी लोकशाही (उदा. चीन मधील शासन प्रणाली)

– सहभागात्मक लोकशाही या अंतर्गत ज्यांच्यावर परिणाम होतात ते सामुदायिकरित्या निर्णय घेतात.

लोकशाहीत व्यक्तिचे कर्तृत्व, व्यक्तिचा दर्जा ठरविते. साधन सामुग्रीवर सर्वांचा अधिकार समान असतो. सर्वांना समान संधी मिळतात. विकासाच्या समान संधी सर्वांसाठी खुल्या असतात. सर्व समान असतात.

**समाजावरील प्रभाव** - या विचारधारेचा प्रभाव संपूर्ण समाजावर झाला. समाज जागृत झाला. अन्याय, विषमता दूर करण्यासाठी सुक्ष्म ते व्यापक स्तरांपर्यंत पाऊले उचलली जावू लागली.

लोकशाहीत, लोकांचे प्रतिनिधी शासनात सामील होवू लागले. जनसामान्यांच्या हितसंबंधाची काळजी घेणारे शासन निर्माण होवू लागले. अल्पसंख्याकानाही शासनात प्रतिनिधित्व मिळाले आणि त्यांचे वेगळे हितसंबंध शासकिय स्तरावर जपण्याचे काम अल्पसंख्यांकाच्या प्रतिनिधिकडून, अल्पसंख्यांक शासनाकडून होवू लागले.

ह्या विचारधारेने, एकेका व्यक्तिपासून ते राज्य–राष्ट्र या पातळीपर्यंत, समाजाच्या प्रत्येक घटकाला प्रभावित केले. लोकांच्या अस्मिता व जाणीवा जागृत केल्या. मानवाला मानव म्हणून अधिकार मिळाले. समाजाची रचना, समाजव्यवस्था, समाज व्यवस्थेतील संस्था, (कुटुंब, शिक्षण, विवाह, आदी संस्था), शासनाचा व संस्थांचा कारभार या विचारधारेने प्रभावित झाला. शासनाच्या आणि संस्थांच्या कामकाजाच्या पद्धतीत स्वातंत्र्य–समता आणि बंधुत्व, यांचे सर्वोच्च महत्त्व राहीले. यामुळे समाजातील भेदभा

Scanned by CamScanner

दूर करणाऱ्या योजना निर्माण झाल्या. अन्याय, भेदभाव यांना आव्हान दिले जावू लागले. समाजातील सर्वात दूरच्या घटकाला–दूर्बल घटकाला अधिकार मिळाले. सामाजिक समता आणि न्याय, यावर समाज रचला जावू लागला. मूल्ये बदलली. कर्तव्य, जबाबदारी आणि सहभाग यांची स्वातंत्र्याशी सांगड घातली गेली. निर्णय–निवड करण्याचे स्वातंत्र्य आणि क्षमता, व्यापक ते सुक्ष्म स्तरावरही विकसित झाल्या. यामुळे प्रथा–परपरा प्रभावित झाल्या. मानवांचे विचार–वर्तन या विचारधारेने प्रभावित केले. यामुळे मानवा –मानवातील नातेसंबंध देखील समानतेचे–आदराचे–स्वातंत्र्याचे झाले.

लिंग, उत्पन्न, वंश, वर्ग, धर्म या आधारे मानवामानवात होणारे भेदभाव संपू लागले. या भेदभावांना आव्हान करण्याची शक्ती समाजात निर्माण झाली. अशा तऱ्हेने या विचारधारेने समाजात फार मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडविले.

पाश्चात्य समाजातील या विचारधारेने समस्त मानव समाजाला आणि भारतिय समाजालाही प्रभावित केले.

अर्थात तरीही प्रत्यक्षात आदर्श स्वरुपाचे–लोकशाहीत अपेक्षित असणारे बदल समाजात घडत नाहीत. उत्पादनाची साधने बहूसंख्य लोकांच्या हाती नसतात. पर्यायाने उत्पादनाची फळेही त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. समानता असुनही काहींना लोकशाहीतही विशेषाधिकार असतात, यातून विषमता निर्माण होते.

औद्योगिकरणामुळे कामगारांचे जीवन कठीण होते. कामगारांचे उत्पन्न कमी असल्याने ती नव्या रुपाची गुलामी करण्याशिवाय त्यांना पर्याय नसतो.

अशा रितीने लोकशाहीतील स्वातंत्र्य थोड्या लोकांना मिळते आणि बहूसंख्यांना दडपून टाकण्यासाठीचे ते स्वातंत्र्य ठरते.

अर्थात संपत्ती वंश लिंग या आधारे यापूर्वी मतदान करण्याचा अधिकार मिळत असे, तो या विचारधारेमुळे नष्ट झाला आणि उलट आता सर्वांना हा अधिकार मिळाला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कष्टकरी वर्गाला राजकिय अधिकार मिळाले. १९२० नंतर स्त्रियांना, पाश्चात्य समाजात मतदानाचा अधिकार मिळाला.

## समाजकार्य

समाजकार्य लोकशाही विचारधारेवर आधारित आहे. समाजकार्याची सेवा देण्याची पद्धत, सेवा देतांनाचे विचार–भावना–नीतितत्त्वे लोकशाहीतून निर्माण झालेली आहे. यामुळे सेवांचा जो परिणाम अपेक्षित असतो तोच परिणाम होतो. समाजकार्याच्या तत्त्वज्ञानाचा आधार लोकशाही आहे.

या विचारधारेच्या प्रभावामुळे आधुनिक काळात समाजकार्याच्या सेवा भेदभाव न करता गरजुंना उपलब्ध करून दिल्या जावू लागल्या. सेवा घेणाऱ्यांचे अधिकार मान्य केले जावू लागले. समाजातील वंचितांचे अधिकार मान्य झाले. समाजात समानता आणण्यासाठी, वंचीतांचे समाजातील योगदान लक्षात घेवून, त्यांना वंचितावस्थेतून संधींचा उपयोग करता येण्याच्या अवस्थेत आणणारे समाजकार्य केले जावू लागले.

Scanned by CamScanner

प्रत्येक मानव–प्रत्येक समुदाय समान महत्त्वाचा मानणारे समाजकार्य केले जावू लागले. यातून सुदृढ समाजाच्या निर्मितीची अपेक्षा केली जावू लागली. आधुनिकोत्तर कालीन समाजकार्यातील बहूसांस्कृतिवाद, अनेकत्ववाद, सभ्यसमाजाची निर्मिती करणाऱ्या विचारधार, लोककेंद्रित सहभागात्मक समाजकार्य यांना, या विचारधारेचा पाया प्राप्त आहे. ही समाजकार्याची विचारधारा आहे.

**समाजपरिवर्तनाच्या आधुनिक विचारधारा**

**पाश्चात्य**

- १. उदारमतवाद
- २. उपयुक्ततावाद
- ३. सामाजिक डार्विनवाद
- ४. मानवाधिकार
- ५. समाजवाद
- ६. बुद्धिप्रामाण्यवाद
- ७. कल्याणवाद
- ८. लोकशाही

**भारतिय**

- १. खिस्ती विचारधारा
- २. हिंदू सुधारणा चळवळी
- ३. कामगार चळवळी
- ४. दलित चळवळी
- ५. गांधीवाद
- ६. सर्वोदय
- ७. राष्ट्रवाद
- ८. भारतिय संविधानाची विचारधारा
- ९. ऐच्छिक संघटनांची विचारधारा इत्यादी

या विचारधारेत

- 'स्वतःच्या जीवनादर स्वतःचा ताबा.' ही संकल्पना आहे.
- जनसामान्यांकडे सत्ता अधिकार दिलेले आहेत.
- मानव क्षमतांवर विश्वास आहे. मानवाच्या ठिकाणी विविध क्षमता असतात यावर विश्वास आहे
- मानवातील संसाधनांची दखल घेतलेली आहे.
- सामुहिकपणे निर्णय घेणाऱ्या गटांकडे, संस्थांकडे, शासनाकडे सत्ता दिली जाते.
- निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग अनिवार्य मानला आहे.
- बहूमताने निर्णय घेतले जातात.
- स्वातंत्र्य, समता, संधी, अधिकार यांना महत्व असते.
- संपन्न, समृद्ध करणारे अनुभव महत्त्वाचे मानले जातात.
- मुक्त निवडणूका, बहुसंख्यांची सत्ता असते.
- अल्पसंख्यांकांचे अधिकार जपले जातात.
- सत्तेचे विकेंद्रिकरण होते.
- लोकशाहीत, कर्तृत्त्व व्यक्तिचा दर्जा ठरविते.
- लोकप्रतिनिधींचे शासन, जनसामान्यांच्या–अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधांची काळजी घेणारे शासन असते.

Scanned by CamScanner

## उदारमतवाद (Liberalism)

आधुनिक कालखंड हा इ. स. १६०० ते १९५० दरम्यानचा कालखंड मानला जातो. मध्यकालीन समाज आणि विचारधारा या काळातही पुढे आल्या होत्या. त्याचबरोबर मध्यकाळापेक्षा आधुनिक कालखंडात, समाज आणि विचारधारा या दोन्ही मध्ये बदलही घडले होते. मध्यकालीन समजातील परिस्थिती–समस्या–समाजातील भेदभाव आदींमुळे समाजाचा विकास थांबला होता. समाजविकासात अडथळे येत होते. त्यामुळे ह्या समाजाला बदलणाऱ्या–समाजातील भेदभाव कमी करणाऱ्या, उर्ध्वगामी विचारधारा मध्ययुगीन समाजात निर्माण झाल्या. त्यांच्या प्रभावामुळे आधुनिक कालखंडातील समाजात बदल दिसू लागले. समाजांची विचारसरणी, समाजातील प्रथा–परंपरा–नियम–समाजाची–रचना–कार्यपद्धती यात बदल झाले. समाजाचे दृष्टिकोन मानसिकता या काळात बदलली. पूर्वीच्या विचारधारांचा आधुनिक समाजात प्रभाव तर होता शिवाय या काळात पुन्हा नव्या विचारधारा उगम पावत होत्याच.

एका समाजाचे अन्य समाजांवर प्रभाव होण्याची, एका समाजातील घटनांचे–विचारधारांचे अन्य समाजांवर प्रभाव होण्याची सुरवात या काळात झाली. ज्या समाजाचे त्याच ठिकाणच्या पुढील समाजावर प्रभाव होणे हे या पूर्वीचे वैशिष्ठ होते ते अशा रितीने आता बदलले म्हणूनच. पाश्चात्य समाज–विचारधारा आणि भारतीय समाज–विचारधारा परस्परांना प्रभावित करू लागल्या, परस्परांकडून शिकु लागल्या.

आधुनिक काळातील नव्या विचारधारांचा पुन्हा समाजावर प्रभाव होवू लागला व समाजात परिवर्तने घडू लागली. पाश्चात्य समाजात तर्कवाद बुद्धी प्रामाण्यवाद इत्यादी विचारधारा होत्याच यातून विविध शोध, शिक्षण, प्रसार याद्वारे तेथे नव्या विचारधारा निर्माण होण्यास गती मिळाली.

या विचारधारांनी समाजपरिवर्तन तर घडविलेच शिवाय समाजातील सेवा व्यवस्थांनाही प्रभावित केले, सेवा मागील तत्त्वज्ञान–विचार, यांना रुप दिले.

### समाजाचे स्वरूप

आधुनिक काळातील समाजात विज्ञान, तर्क यांचा वाढता प्रभाव होता. आधुनिकता होती, तंत्रज्ञान–औद्योगिकरण यांचा समाजावर प्रभाव होता. साम्राज्यवाद भांडवलशाही, वसाहतवाद फोफावला होता. महायुद्धे, जागतिक मंदी यामुळे जागतिक पातळीवर समाजात असंतुलन निर्माण झाले होते. देश आणि समाज विभागलेले होते. वंचित–पिडीत–मुख्य धारेपासून दूर गेलेले– मागासलेले–धोकादायक स्वरुपाचे जीवन जगणारे मानव गट आणि देश अस्तित्वात होते. साधन–संपत्तीवर ताबा असणारे, त्यामुळे सत्ता आणि दर्जा प्राप्त झालेले समाजातील घटक–देश, निम्नस्तरीयांचे शोषण करीत होते. समाजातील व्यवस्था, भेदभाव निर्माण करण्याचे आणि भेदभाव कायम

Scanned by CamScanner

राखण्याचे कार्य करीत होत्या. त्यामुळे समाज आणि समाजापासून दूरावलेल्यांमधील अंतर वाढत होते–विकसित आणि अविकसित देशांमधील दरी रुंदावत होती. ह्या विषमतेमुळे, असंतोष विघटन आणि उद्रेक घडवून समाजव्यवस्था मोडकळीस आणणारी परिस्थिती समाजात निर्माण झाली होती. याच काळात अनेक नवे देश उदयाला आले. गुलाम देश स्वतंत्र झाले– देशांच्या सिमा रेषांना आकार येवू लागल्या. यातून समाजात संघर्षाचे–अभावाचे वातावरण निर्माण झाले.

आधुनिक समाजात औद्योगिकरण होतांना उद्योगांना कामगारांची गरज वाढू लागली. हे कामगार शेतमजूराच्या रुपात तेव्हा काम करीत होते. औद्योगिकरणा दरम्यान, उच्चकुलीन सरदारांना सत्तास्थानावरुन दूर करणे–त्यांच्या सत्तेला मान्यता आणि संरक्षण देणाऱ्या ख्रिस्ती आचार्यांची उचलबांगडी करणे, उद्योगपतींना गरजेचे वाटू लागले. औद्योगिकरणाच्या अनुषंगाने समाजात याकाळात मध्यमवर्ग, व्यापारीवर्ग, उद्योजक, बँक चालक असे वर्ग उदयाला आले. चलसंपत्तीवर कब्जा करून समाजात हे वर्ग सत्ता आणि दर्जा मिळवू लागले. यामुळे जमीनदार, पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांसमोर या वर्गाने आव्हान उभे केले. यातून उदरमतवादाला पोषक परिस्थिती समाजात निर्माण झाली.

समाजाला अडचणीची ठरू लागलेली, समाजात समस्या निर्माण करणारी, पूर्वीची समाजव्यवस्था बदलण्याची गरज आधुनिक काळात निर्माण होवू लागली. राजेराजवाड्यांच्या सत्तेवर मर्यादा ठेवण्यासाठी, सरंजामशाहीला–त्याद्वारे समाजात निर्माण होणाऱ्या शोषणाला– समस्यांना समाजातून दूर करण्यासाठी, लोकशाहीचा समाजात विकास झाला. गणराज्य–लोकराज्य ही संकल्पना उदयास आली.

भांडवालशाहीला रोखणारा आणि समाजात समतोल समानता निर्माण करणारा समाजवाद निर्माण झाला.

अशारीतीने, पाश्चात्य समाजात आधुनिक काळात निर्माण झालेल्या विचारधारांमुळे देशोदेशी कायद्याचे राज्य येवू लागले. लोकांच्या हाती सत्ता देण्यात आली. जनतेची संमती आणि सहभाग यांची भूमिका शासन व्यवस्थेत महत्त्वाची ठरू लागली. ह्याचा समाजावर फार मोठा प्रभाव झाला. नातेसंबंध, मुल्ये समाजव्यवस्था समाजाची रचना, यांना या बाबींनी प्रभावित केले.

या बरोबरच प्राचिन आणि मध्ययुगिन समाजांचे प्रभाव–विचारधारांचे प्रभावही आधुनिक समाजावर होतेच. मध्य काळातील विचारधारा आणि सामाजिक परिस्थिती यामुळे तात्कालीन समाजात निर्माण झालेल्या भेदभावांमध्ये आणि समस्यांमध्ये नव्या रुपातील भेदभावांची आणि समस्यांची भर आधुनिक काळात पडली होती. समाजातील समस्या आणि परिस्थिती लक्षात घेता नव–नव्या विचारधारा समाजात निर्माण होत

Scanned by CamScanner

होत्या. ज्या द्वारे समाजाला परिवर्तित केले जात होते. समाजवाद, कल्याणवाद, सामाजिक डार्विनवाद, लोकशाही अशा अन्य विचारधारा उदारमतवादाबरोबर समाजात अस्तित्वात होत्या.

समाजातील विविध विचारधारा, जीवन जगण्याच्या पद्धती–समाजरचना–समाजाच्या कार्यपद्धती, यात बदल घडवित होत्या, मूल्ये बदलत होत्या. उदारमतवादी विचारधारा त्यापैकी एक महत्त्वाची विचारधारा होती.

या काळात धर्माची धार्मिक आणि अन्य विचारधारांची जागा विज्ञानाने तर्काने घेतली. धर्मातित विचारधारा प्रभावी ठरू लागल्या. त्यामुळे व्यक्तिचे–मानवाचे समाजात महत्त्व वाढले. व्यक्तिवाद, व्यक्तिचा पुढाकार–सहभाग, व्यक्तिचे नियंत्रण या कल्पना विकसित झाल्या. यातून उदारमतवादाला पायाभूत आधार प्राप्त झाला.

उदारमतवादाने सामाजिक आणि राजकिय परिवर्तनांचा पाया घातला. या विचारधारेमुळे अनेक युरोपिय देशात क्रांती घडून आली.

उदारमतवादाला पोषक परिस्थिती जगभरच्या देशांमध्ये निर्माण होवू लागली. १६८८ सालच्या इंग्लंडमधील क्रांतीने लोकसभेला राजकिय बाबतीतील उच्चाधिकार दिले यापूर्वी उच्चकुलीनांना–सरंजामशहांना–राजेराजवाड्यांना–धर्मसत्ताधिषांना, हे अधिकार होते.

१७६० दरम्यान ब्रिटीश शासनाने उत्तर अमेरिकेतील वसाहतीना ब्रिटीश लोकसभेत अधिकार दिले नाहीत पण त्यांच्या कडून करवसुली सुरू केली. वसाहतींनी कर देण्यास नकार दिल्या नंतर १७७५ युद्ध झाले व नंतर १७८१ साली अमेरीकेला स्वातंत्र्य मिळाले. या नंतर अमेरीकेतील जनसामान्यांना सर्वोच्च अधिकार असल्याचे मान्य झाले.

अशीच परिवर्तने फ्रांसमध्ये घडली. फ्रेंच क्रांतीपूर्वी सामान्यांचे सरंजामांकडून शोषण होत होते. अतोनात कर लावले जात होते. शेतीतुन उत्पादन होत नव्हते. स्वातंत्र्य नव्हते. अशा सामाजिक परिस्थितीत जेव्हा स्वातंत्र्य बंधुत्व आणि समतेचे वारे वाहू लागले आणि क्रांती घडली, तेव्हा त्यानंतर १७८९ साली नागरीकांना–माणसांना अधिकार देणारा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. अर्थात यामुळे भेदाभेद शोषण संपले नाही पण राजाचे अधिकार मात्र मर्यादित झाले आणि लोकांमधील अधिकाराबद्दलची जागृती वाढू लागली.

या काळातील विचारधारातून राज्य–राष्ट्र या संकल्पना पाश्चात्य देशात निर्माण झाल्या. त्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित होवू लागल्या. ही राज्ये आणि राष्ट्रे उदारमतवादावर आधारलेली होती. राजे, सरंजामशहा, धर्मसत्ता असणाऱ्यांकडून, औद्योगिकरणानंतर कारखानदारांकडे, व्यापारीवर्गाकडे सत्ता हस्तांतरीत होवू लागला.

Scanned by CamScanner

सैनिकी ताबा मिळवण्यासाठी युद्धेही याच काळात या भावनाच्या अतिरेकापोटी झाली. वंशद्वेश, वर्णद्वेश, मानव सहार घडले, महायुद्धे यातून निपजली, हुकुमशहा निर्माण झाले. राष्ट्रियत्वाच्या भावनेमुळे अनेक देश स्वातंत्र्य आणि स्वयंशासन यांची मागणी करू लागले. समाजपरिवर्तनाची अशी चिन्हे समाजात दिसु लागली.

**राष्ट्रवादातून पुढे वाटचाल :**

कल्याणकारी राज्याची विचारधारा समाजात मान्यता पावली आणि राज्ये कल्याणकारी राज्ये बनु लागली. यामुळे, लोकांप्रती, विशेषकरून समाजापासून दूर गेलेल्या–धोकादायक हानीकारक स्वरुपाचे जीवन जगणाऱ्या–त्यामुळे विकासापासून वंचित राहणाऱ्या आणि शोषित ठरणाऱ्या वर्गांप्रती, राज्याची जबाबदारी वाढली.

वसाहतीतून कच्चा माल मिळवून इंग्लंडमध्ये पक्का माल निर्माण होवू लागला तेथे औद्योगिक क्रांती होवू लागली. अनेक प्रकारची यंत्रे आणि यांत्रिकीकरणामुळे उत्पादन वाढले. कारखान्यांची संख्या वाढू लागली. सन १७०० साला पासून उदारमतवादामुळे असे बदल घडू लागले. याच वेळी वसाहतींची पिळवणूक तेथील मालाला किंमत न मिळणे, कामगार–मालक यातील भेद अशा समस्याही निर्माण होवू लागल्या.

या काळात, औद्योगिकरण–यांत्रिकीकरणा बरोबरच आधुनिकीकरण होवू लागले. लोकशाही आली ज्यामुळे लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरू लागला.

याच दरम्यान ऐहिकतावाद, उपयुक्ततावाद सामाजिक डार्विनवाद यांचाही उगम झाला. या समकालीन विचारधारा परस्परांना पुरक होत्या. ह्या विचारधारांनी समाजाच्या जीवन जगण्याच्या पद्धतीत–विचार करण्याच्या पद्धतीत आमुलाग्र बदल घडविले. यामुळे समाजाच्या गरजांचे आणि समस्यांचे स्वरूप बदलले. भांडवलशाही प्रबळ झाली. सबब नवे वर्ग, नवे भेदभाव, नव्या प्रकारचे शोषण समाजात निर्माण झाले. गरीब–श्रीमंत, मालक–मजुर असे वर्ग समाजात निर्माण झाले. ह्या विचारधारांमुळे स्पर्धेचे युग सुरु झाले. शिक्षण साधन संपत्ती आणि सत्ता या कडे समाजाचा ओढा वाढला.

**उदारमतवाद :**

या संपूर्ण पार्श्वभूमिवर विकास पावलेल्या उदारमतवादाने पुढील विचार देवून समाजाला बदलविले –

उदारमतवादामुळे आणि लोकशाहीमुळे, खाजगी संपत्ती धारण करण्याला मूलभूत स्वातंत्र्य मानले गेले. या हक्कांवर कोणाचीही मर्यादा नव्हती. राज्यसुद्धा या स्वातंत्र्याला मर्यादीत करू शकत नाही अशी ही विचारधारा होती. म्हणजे मानवाला स्वातंत्र्य देणारी आणि राज्याच्या सत्तेवर मर्यादा आणणारी ही विचारधारा होती. ह्या

Scanned by CamScanner

विचारधारेनी समाजाला बदलले आणि मानवाचे महत्त्व वाढवले. इतर बाबी दुय्यम ठरू लागल्या.

उदारमतवाद आणि लोकशाहीमुळे समाजात सर्वांना संपत्तीचा हक्क –मालकी हक्क आहे. या कल्पनांना मान्यता मिळाली व अशा संकल्पनांचे महत्त्व वाढले. घटनांचे महत्त्व वाढले. समाजाचे निर्णय घेण्यात, समाजाचे स्वरूप ठरविण्यात या संकल्पनांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरू लागली.

उदारमतवादाचे पुरस्कर्ते–उद्‌गाते ॲडम स्मिथ या अर्थतज्ञानी. "द वेल्थ ऑफ नेशन्स" मध्ये उदारमतवादाची संकल्पना मांडली. त्यात व्यक्तिस्वातंत्र्याला अनन्य साधारण महत्त्व दिले गेले. आर्थिक बाबतीतील स्वतंत्र मत आणि त्या मताचे महत्त्व, यातून व्यक्तिला हे स्वातंत्र्य मिळू शकते, असे प्रतिपादन त्यांनी केले. या मताचा प्रभाव समाजाच्या भांडवलशाही विकासावर झाला. स्वतंत्रपणे साहसी उपक्रम राबविणे, स्वतंत्र व्यापार करणे यावर या विचारांचा प्रभाव झाला. मागणी आणि पुरवठ्याचे गणित, उत्पन्न ठरविते. वस्तुंच्या किंमती आणि वस्तुंचे उत्पादन करणाऱ्याचे उत्पन्न या गणिताद्वारे ठरते. मागणी नुसार उत्पादन करणे– पूरवठा करणे, आपल्या फायदयानुसार व बाजारपेठेतील स्पर्धेनुसार उत्पादन आणि पुरवठा करणे, ह्या प्रक्रियेत कोणीही हस्तक्षेप करू नये. मागणीनुसार उत्पादन, पुरवठा आणि उत्पन्न ही प्रक्रिया पूर्ण मुक्त असावी असे स्मिथ यांनी म्हटले. सद्यकालीन जागतिकीकरणाचा पाया अशा रीतीने उदारमतवादाने या काळात घातला.

**लेइसेझ फेअर**

लेइसेझ फेअर (lassez-faire) ही संकल्पनाही उदारमतवादाच्या काळात उदारमतवादाच्या अनुषंगाने उदारमतवादाला पुरक म्हणून उदयाला आली. यात व्यक्तिगत कृतीवर, विशेषतः व्यक्तिगत व्यापारावर कोणतेही सरकारी नियंत्रण न ठेवणे, व्यक्ति स्वातंत्र्यावर सरकारी नियंत्रण न ठेवणे हे धोरण ठेवले जाते.

या संदर्भात स्मिथ यांनी असे नमुद केले की, शासनानेही व्यापारात हस्तक्षेप करू नये, व्यापाराची पूर्ण मोकळीक असावी. तसेच या दरम्यान ज्यांचे नुकसान होते जे या व्यवस्थेमुळे वंचित पिडीत ठरतात मागे राहतात, त्यांना शांत ठेवण्यासाठी कल्याणाच्या नावाने देण्यात येणारे फायदे, सरकारने बंद करावेत.

या संकल्पनेच्या प्रभावामुळे राज्यांनी लेझसेझ फेअर धोरण अवलंबीले.

लेझसेझ फेअर धोरण – (Laissez faire)

औद्योगिक क्रांती आणि भांडवलशाहीमुळे निर्माण झालेले प्रश्न सोडवण्यासाठी इंग्लंडने धोरणात्मक बदल केले. औद्योगिक क्रांती पूर्वी व औद्योगिक क्रांतीच्या काळात, काहीकाळ सरकारचे धोरण निष्क्रियतेचे होते. या निष्क्रियतेच्या धोरणाला लेझसेझ असे नाव होते.

Scanned by CamScanner

या निष्क्रियतेच्या धोरणाचा अर्थ असा होता की फक्त देशात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे कर्तव्य सरकारचे असुन व्यापारक्षेत्रासह अन्य क्षेत्रात सरकारने हस्तक्षेप करू नये.

या धोरणामुळे, उदयोन्मुख भांडवलशाही अर्थव्यवस्थेत ढवळाढवळ करण्यास इंग्लंडचे शासन तयार नव्हते.

पुढे मात्र भांडवलशाहीत कामगारांच्या होणाऱ्या पिळवणूकीमुळे, दारिद्र्यामुळे या धोरणात सरकारने बदल केला व विविध कायदे करून, नियंत्रण ठेवून सुधारणा घडवून सर्व क्षेत्रांकडे लक्ष पुरविले.

या काळात सुरुवातीला काही उदारमतवादी विचारवंतांनी घटनात्मक आणि सनदिशर शासनव्यवस्थेचाही पुरस्कार केला. अर्थात म्हणून त्यांचा लोकशाहीवर विश्वास होता असे नाही तर मध्यमवर्गाकडे राजकिय सत्ता जाण्यावर अंकुश लावण्याचा त्याचा तो प्रयत्न होता. उदारमतवादी भांडवलशहांनी, लोकशाही संस्थांवर नियंत्रण –मिळवण्यासाठी त्यावर ताबा मिळवण्यासाठी, अत्यंत शक्तिवान दबावगट निर्माण केले.

अशा तऱ्हेने या विचारधारेमुळे समाजात नागरिकांना हक्क स्वातंत्र्य मिळाले. हे अबाधीत स्वातंत्र्य होते, व्यक्तिचे स्वातंत्र्य वाढले आणि व्यक्तिच्या मताला महत्त्व प्राप्त झाले. कायद्याचे राज्य निर्माण होवून लोकांच्या हाती सत्ता आली. लोक–सहभागाला महत्त्व मिळून अन्य सर्व बाबी दूय्यम ठरल्या. न्यायासाठी संघटित होण्यास सुरुवात झाली. आर्थिक सत्तेचे महत्त्व वाढले. राज्य–राष्ट्र कल्पना विकसित होवून त्यांच्या सत्ता अमर्याद झाल्या. दूसरीकडे शोषित, अरक्षित यांचा विचार करणे या विचारधारेने नाकारले. सबब लोकशाही, कल्याणवाद, मानवतावाद, समाजवाद या पेक्षाही विचारधारा वेगळी ठरते.

अशा तऱ्हेने आधुनिक काळातील उदारमतवादाचा क्रमाक्रमाने विस्तार आणि विकास होत गेला. त्यात अनेक विचार येवून मिळाले, त्याची व्याप्ती वाढली आणि एकंदर मानव समाजाचे–त्या समाजातील नातेसंबंधाचे स्वरुपच या विचारधारेने बदलले. मानव आणि सृष्टितील संबंधांना या विचारधारेने हानी पोहोचवली गेली.

**उदारमतवादाचा समाजावरील प्रभाव**

व्यवहारवाद अत्यंत महत्त्वपूर्ण ठरून, मूल्ये–संस्कृती–प्रथा–परंपरा यांना, कःपदार्थ मानले जावू लागले. भौतिक प्रगती घडवणाऱ्या ह्या विचारधारेने मानव जीवनाचे सांस्कृतिक–सामाजिक अंग महत्त्वहिन ठरविले, मानवाला मतलबी बनविले. ज्या मुळे समाजजाळ्याची विण सैल झाली. या मुळे समाजात बदल तर घडलेच पण त्याच बरोबर नव्या समस्या आणि गरजा निर्माण झाल्या.

उदारीकरणाच्या विचारधारेत, कल्याणकारी विचारधारा आणि कल्याणकारी धोरणे रद्द करावीत, ही शिफारस होती. त्यामुळे समाजात फार मोठे परिवर्तन घडणार

Scanned by CamScanner

होते. आधुनिक काळातील ह्या विचारधारेचे वरील प्रकारचे प्रभाव हळूहळू घडलेच आणि ते प्रभाव सद्यकालीन आधुनिकोत्तर काळात जास्त दिसू लागले आहेत. जागतिकीकरण आणि उदारीकरण यामुळे कल्याणाचा मार्ग सोडून खाजगीकरणाचा मार्ग वाढला आहे.

लोकशाही मानवाधिकार समाजवाद यांना प्रभावहिन करून मागे सारण्याचे काम उदारमतवादाने केले हयाचे समाजावर अनेक विपरित परिणाम झाले.

समाजातील फार मोठा वर्ग (वंचितांचा वर्ग) प्रभावहीन ठरू लागला. कल्याणकारी लोकशाही मानवाधिकार या विचारधारांमुळे समाजातील या वर्गाला प्राप्त झालेली जागा उदारमतामुळे त्यांच्या कडून हिरावली जावू लागली. ते प्रभावहिन होवू लागले. या वर्गाला साधने–संपत्ती अत्यल्प प्रमाणात उपलब्ध होवू लागल्याने हा वर्ग समाजापासून अधीकच मागे टाकला जावू लागला. सबब समाजातील वंचितांच्या–समाजापासून दुरावलेल्यांच्या यातना वाढल्या, समस्या वाढल्या, समाजात वर्गावर्गातील दरी रुंदावली आणि समाजाच्या शांतीला–स्थैर्याला धोका निर्माण झाला. नव्या प्रकारच्या सामाजिक –सांस्कृतिक समस्या, मानव समाजात निर्माण झाल्या. मूल्यहिनता, संस्कृतीचा विनाश, आधुनिकिरणामुळे जीवनातील बार्बीच्या महत्त्वक्रमात बदल, नातेसंबंधात समस्या, वैयक्तिक –कौटुंबिक विघटन, असुरक्षितता, आधारहिनपणा अशा समस्या बरोबरच पर्यावरणाचा नाश, लोकसंख्येची समस्या, सामाजिक अस्थिरता, हिंसा, शैक्षणिक–आर्थिक समस्या बेकारी, शोषण अशा समस्यांनी आक्राळ–विक्राळ रूप धारण केले.

मानव समाजाच्या स्थैर्यालाच नव्हे तर अस्तित्वालाही धोका निर्माण करणारे प्रभाव ह्या विचारधारेने केले, समाजात शोषित वर्ग वाढवला.

या विचारधारेमुळे समाजात असमाधान आणि पुन्हा असुरक्षिततेची भावना निर्माण होवू लागली. प्रगती, विकास विशेषतः आर्थिक विकास, उत्पादन, उत्पन्न यांना आग्रक्रम देतांना, या प्रक्रियेतून समाजात जे वंचित–पिडीत वर्ग निर्माण होतात–यातनामय जीवन–मागासलेपणा ज्यांच्या वाट्याला दिला जातो, त्या गरजू–गरीब वर्गाबद्दल ह्या विचारधारेत कठोर भूमिका घेतली गेल्याचे आढळते. उदारमतवादातून जी व्यवस्था समाजात निर्माण होते, त्या व्यवस्थेचे जे बळी ठरतात– त्यांना कल्याणकारी विचारधारेने जी तुटपंजी मदत दिली जाते, त्यावर सुद्धा ही विचारधारा आघात करते. या विचारधारेमुळे लायकी असणारेच–क्षमता असणारेच महत्त्वाचे ठरतात. अश्या लायकीनुसारच जीवन मिळणार–संधी मिळणार–स्तर आणि दर्जा मिळणार हे स्पष्ट होते. दूर्बल–निर्बल– अशक्त– मागे पडणारे–कमी क्षमता असणारे किंवा अक्षम अशा लोकांचा/वर्गांचा येथे विचार नाही. स्पर्धेत जे टिकणार नाहीत त्यांचा विचार या विचारधारेत नसल्याने समाजातील दूर्बल अधिकच दूर्बल होणार, वंचित अधिकच वंचित होणार. क्षमता नसल्याने त्यांना संधी मिळणार नाहीत म्हणून त्यांचा विकास

Scanned by CamScanner

होणार नाही—म्हणून ते अधिक दुर्बल बनणार व पुन्हा त्यामळे त्यांना सधी मिळणार नाहीत सबब ते समाजापासून अधिकाधिक दूर लोटले जाणार हे स्पष्ट होते. समाजात असा हा वर्ग मोठा असल्याने समाजात विषमता—असंतोष—असमतोल—विघटन, असे चक्र निर्माण होणार त्या मुळे केवळ त्यांचीच नव्हे तर संपूर्ण समाजाचीच प्रगती खुंटणार संपूर्ण समाजाची हानी होणार असे चित्र निर्माण होवू लागले. यामुळे समाजातील भेदाभेद—स्तरीकरण वाढले. सामाजिक डार्विनवादासारखे विचार या विचारधारेने समाजात उचलून धरले.

उदारमतवादातून निर्माण होणाऱ्या जागतिकीकरणामुळे आणि खुल्या बाजारपेठेमुळे स्थानिक उत्पादनांच्या आणि स्थानिक संस्कृतीच्या पिछेहाटीला या काळापासूनच सुरुवात होवू लागली. श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होवू लागले (गरीबांना संधी नाही म्हणून साधन—सामुग्री उपलब्ध नाही, हाती सत्ता नाही म्हणून दर्जा नाही म्हणून ते गरीब राहणार किंवा अधिक गरीब होणार)

अशा रीतीने उदारमतवादाने याच काळातील कल्याणकारी तसेच इतर अनेक विचारधारांची, शिकस्त केली. समाजातील भेदभावांना उच्च—निच वर्गांच्या उदयाला वेग आणला. समाज व्यवस्थेमुळेच निर्माण होणाऱ्या वंचित—पिडीतांचा—अरक्षितांचा विचार उदारमतवादात नसल्याने आणि उलट समाजापासून दूर गेलेल्यांचा विचार करून त्यांना समाजाच्या मुख्यधारेत आणण्याचे प्रयास करणाऱ्या कल्याणकारी विचारधारेला मागे सारणारी ही विचारधारा ठरली. या वंचितांना—पिडीतांना, समाजातील सक्षमाबद्दल द्वेष करण्याशिवाय बंड करून उठण्याशिवाय दूसरा पर्याय या विचारधारेने शिल्लक ठेवला नाही. या विचारधारेने समाजात पिडीत शोषित वर्ग वाढवला, मोठ्या वर्गाला समाजापासून दूर ठेवले—मागे लोटले.

या विचारधारेमुळे समाजात जातीवादाच्या ठिकाणी आर्थिक स्तरीकरणाला महत्त्व प्राप्त झाले. एकी, प्रेम, आत्मियता, सामुदायिकतेची भावना अशा मानवी मूल्यांची पिछेहाट झाली. उदारमतवादाने प्रभावित समाजात जबाबदारी, प्रामाणिकपणा, गुणात्मक विकास, सहनशिलता, अनुकंपा—दया—कणव, माणुसकी, दिलदारपणा हे टिंगलीचे विषय ठरू लागले. अनादर, स्वार्थ पारायणता, अहं/मीपणा/आत्मकेंद्रितपणा, संधीसाधूपणा यांना, नवे आदर्श मानले जावू लागले.

या विचारधारेमुळे व्यवसाय निवडीची मोकळीक मिळाली, क्षमता—गरज आणि आवड यानुसार व्यवसायाची निवड होणे शक्य झाले. शारिरीक श्रमांना उत्पादनात श्रमीकाने दिलेले योगदान, या नात्याने पाहीले जावू लागले. तरी श्रमीक आर्थिक दृष्टीने पूर्णपणे भांडवलदारांवर अवलंबून राहू लागले. श्रम भांडलवदारांनाच विकणे भाग असल्याने भांडवलशाही कडून श्रमीकांचे शोषण होवू लागले. समाजात असे वर्ग निर्माण होवून भेदाभेद होवू लागले, उच्च—निच असे स्तरीकरण होवू लागले. अर्थात या

Scanned by CamScanner

शोषण व्यवस्थेला वैयक्तिकरणाच्या, उदारमतवादी कल्पनेच्या नावाने झाकले जात होते. या सर्व परिस्थितीने समाज विघटित होवू लागला समाज विघटनाची बिजे उत्पन्न झाली.

## समाजकार्य

अशा समाजातील समस्या आणि गरजा लक्षात होवून सामाजिक परिस्थितीला प्रतिसाद देणारे समाजकार्य गरजेचे ठरू लागले. समाजाच्या मागण्या लक्षात घेवून समाजात समानता आणि सामाजिक न्याय निर्माण करणारे समाजकार्य गरजेचे ठरु लागले. या विचारधारेच्या प्रभावातून झालेले सामाजिक बदल लक्षात घेवून त्या परिवर्तित समाजात उपयोगी ठरेल, परिवर्तीत समाजातील शोषितांच्या गरजा पूर्ण करेल, अशा समाजकार्याची गरज समाजाला वाटू लागली. तेव्हा या सर्व बाबी लक्षात घेवून समाजकार्याने आपले धोरण ठरविले. या परिस्थितीत उपयोगी ठरतील आणि परिणामकारक ठरतील असे मार्ग–अशी मदतीची पद्धत–अशी मदत–असे दृष्टिकोन (उदा. विकासात्मक, पुरोगामी) समाजकार्यात या दरम्यान निर्माण झाले. यामुळे समाजकार्य वास्तविक परिस्थितीला उत्तर देणाऱ्या सेवा निर्माण करू शकले. समाजातील शोषितांप्रती आणि पिडीतांप्रती आपली जबाबदारी पार पाडतांना समाजकार्यात विकासात्मक दृष्टिकोन या काळात विकसित होवू लागले. (कल्याणकारी दृष्टिकोन वगळता समाजकार्याचे अन्य सर्व दृष्टिकोन जसे पुरोगामी, समस्या समाधान मार्ग, आणीबाणीत हस्तक्षेप, परिस्थितीजन्य दृष्टिकोन, स्त्रीवादी दृष्टिकोन हे सर्व दृष्टिकोन विकासात्मक दृष्टिकोन आहेत)

उदारमतवादातून समाजघटकांना समाजापासून दूर करणारी समाजव्यवस्था निर्माण होवू लागली. म्हणजे समाजकार्य सेवांची गरज असणारा वर्ग समाजात मोठ्या प्रमाणात निर्माण होवू लागला. या वर्गाच्या यातनांना समाजव्यवस्थाच कारण ठरत असल्याने त्या व्यवस्थात बदल घडवणारे स्वरुप समाजकार्याने या काळात धारण केले. या समस्यांना व्यक्ति कारण नव्हती, तर व्यवस्था कारण होती. सबब, 'व्यक्तिंना बदलणे गरजेचे नसुन व्यवस्था बदलणे गरजेचे आहे!,' हा विचार समाजकार्याच्या केंद्रस्थानी आला. शोषित अरक्षित समाजकार्याच्या केंद्रस्थानी आले.

उदारमतवादी विचारधारेचा समाजावरील प्रभाव महत्त्वाचा ठरू लागल्याने, समाजाला लक्षात घेवून समाजकार्य केले जात असल्याने, समाजकार्याच्या औपचारिक शिक्षणात या विचारधारेला महत्त्वपूर्ण स्थान दिले गेले.

Scanned by CamScanner